// सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर
शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.
E-mail: ronagpur.dte@gmail.com Web:- rdtenagpur.org.in
दुरध्वनी क. ०७१२— २५६५१४३ फॅक्स कं. ०७१२—२५६१६६३

क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि/गु.ण/पदविका/२०१३/3903
दिनांक:— 19 NOV 2013

प्रति,
प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/
नॉन एआयसीटीई संस्था,

विषय :— शैक्षणिक सत्र २०१३—२०१४ साठी प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या तपासणीबाबत.

उपरोक्त विषयांबाबत कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेतील शैक्षणिक सत्र २०१३— २०१४ च्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका , थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदविका आणि नॉन एआयसीटीई च्या अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्या तपासणीचे काम झालेले आहे. परंतू संस्थेने अद्याप गुणवत्ता याद्या या कार्यालयात सादर केलेल्या नाही. अशा सर्व संस्थांना या पत्राद्वारे कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेची गुणवत्ता याद्या दि. ३०/११/२०१३ पर्यत या कार्यालयात सादर कराव्या. ज्या संस्थेच्या गुणवत्ता याद्या दिलेल्या मुदतीत या कार्यालयात सादर झाल्या नाहीत त्यांची गुणवत्ता यादी प्रमाणित करण्यांकरिता या कार्यालयाच्या इतर कामामुळे विलंब झाला व सदर संस्थेचा हिवाळी २०१३ चा निकाल म.रा. तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई या कार्यालयाने जाहीर केला नाहीत तर सदर विलंबास संस्था स्वत: जबाबदार राहील याची सर्व संस्थेने नोंद घ्यावी.

तसेच ज्या संस्थेची गुणवत्ता यादी या कार्यालयामार्फत तपासणी करण्यांत येणार आहेत अशा सर्व संस्थेने दि. ३०/११/२०१३ पर्यत या कार्यालया कडून आपल्या संस्थेच्या गुणवत्ता याद्या तपासणी करुन घ्याव्यात. सदर मुदती नंतर तपासणीकरिता येणाऱ्या संस्थांची गुणवत्ता यादी या कार्यालयाकडून तपासली जाणार नाही व तसा अहवाल म.रा.तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई या कार्यालयास कळविण्यांत येईल.

तरी सदर कामाचे गांर्भिय लक्षात घेवून संस्थेने प्रथम प्राधान्याने गुणवत्ता याद्या मंजूर करुन घ्याव्या.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.